# प्रकरण ४ थे

## झोंबीतील सामाजिक विचारांचा वेध

झोंबीमध्ये आर्थिकदृष्टया निम्न व उच्चस्तर दिसून येतो. पु. ल. देशपांडे म्हणतात " आनंदच आणि रात्रंदिवस शारीरिक कष्ट करून दोन वेळची भाकरी न मिळणा-या आर्थिक स्तरातल्या हजारो मुलांच आयुष्य हयाच काटयाकुटयांनी भरलेल्या वाटेनं गेल". [१]

लिंगाप्पा त्यांचे कुटुंब, रतनुची बहिण कमळा आणि तिचा मुलगा बाळू ही रोजगार करीत दिवस कंठताना दिसतात. रत्नाप्पाच्या मळयात सालगडी म्हणून राहिलेला निंबाळकराचा गणप्पा, शाळा सोडून सतत रोजगार करीत दारिद्रयात आयुष्य कंठणारा फाळक्याचा शिर्पा, ढोल्याची ताना ही सारी माणसे आर्थिक दृष्टया निम्नस्तरात दारिद्रयात, हालाखीत जीवन कंठणारी माणसे आहेत. पोटासाठी रात्रंदिवस कष्ट करूनही अनेक वेळा उपाशी रहावे लागते. यातूनच अनेकदा भांडणे कलह मानसिक त्रास तरीही जगण्याची आशा त्यांच्या मनात बळावत होती. याच स्तरात असणारे सिद्‌ध माळकर हा म्हातारा धनगर दारात बसून बायकोला शिव्या देणारा, लक्ष्मू म्हातारा, बापू, पद्‌माण्णा हा म्हातारा याला मूल-बाळ नव्हते तरीही शेती करून नवरा-बायको पोट भरत होते. अशा म्हाता-यांचे अस्तित्वशून्य जीवन, त्यांना भोगावे लागणारे दुःख, उपासमार मनाला चटका लावून जाते. ज्यांनी लहानपणापासून ते म्हातारपणापर्यंत सतत कष्ट केले तरीही त्यांची उपासमार झाली पण न डगमगता ती कोणत्या ना कोणत्या आशेवर सतत जगताना दिसून येतात. इथे त्यांच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्ने, भावना, महत्वकांक्षा घरातील आर्थिक परिस्थितीमुळे धुळीला मिळताना दिसतात. भवितव्यासाठी आयुष्य त्यासाठी करावी लागणारी धडपड याचा आराखडा त्यांच्यासमोर नसतो. सतत जीवनाशी संघर्ष एखाद्या समस्येतून उद्‌भवणारी दूसरी नवीन समस्या अशा चक्रव्युहात अडकून सतत संघर्ष करीत जगणे हाच मार्ग त्यांच्यापुढे असतो.

घरात खायला अन्न नाही. दिवसभर कष्ट केले तरच रात्रीचे जेवन मिळणार असते. अशा भयानक परिस्थितीत लेखक शिक्षणासाठी मनाने पेटून उठतो. आपल्या इच्छा, आकांक्षा, जिद्द याच्या जोरावर तो शिक्षण घेण्याचे ठरवितो. यासाठी त्याला आपल्या बाल्याची किंमत द्यावी लागते.

'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत शेतकरी त्या शेतजमिनीवर रोजगार करणारे शेतमजूर यांचे अतिशय वास्तव, दाहक परिणामकरित्या चित्रण आले आहे. या कादंबरीमध्ये असणारा उच्चस्तर हा जमीन मालकांचा, पैशेवाल्यांचा आहे. निगडीकर वकील, भागवताचा आण्णा, मळा असणारा भट, केनवडेकर इनामदार ही मंडळी

उच्चस्तरावर जगणारी आहेत. त्यांचे स्वतःचे मळे आहेत ते वर्षानुवर्षे फाळयाने देतात आणि शेतमजूरांकडून रात्र-दिवस राबवून कामे करून घेतात. एखाद्या शेतक-याने आवाज उठवलाच तर त्याला कोर्टात खेचतात. तेथे वकिलीला पैसे देवून खोटयाच खर करून केस जिंकतात. शेतमजूरावर सरळमार्गी जीवन जगू देत नाहीत, त्यांचे जास्तीत जास्त शोषण करून आपला फायदा झाला की वा-यावर सोडून देतात. या उच्चस्तरातील लोकांची मुले शहराच्या ठिकाणी शिक्षणासाठी असतात. शहरात ऐसपैस जागा, खायला चांगल चुंगल अशी आरामशीर बसून खात असतात. शेतात राबणा-या शेतमजूरांचे कष्टाचे फळ या उच्च स्तरातील लोकांनाच जास्त मिळते. यातूनच शेतमजूरांचे शोषण होते. अशी उच्चस्तरातील शिकणारी मुले व निम्नस्तरात संघर्ष करून शिकणारी मुले यांच्यात फरक दिसून येतो.

## विविधतेने नटलेला समाज

'झोंबी' मध्ये येणारे समाजदर्शन व्यापक पातळीवरचे आहे. गावगाडयातील रहाटीचे सूक्ष्म दर्शनही आपल्याला घडते. मराठा, कुणबी, दलित, ब्राम्हण, धनगर, सणगर, माळी, महार, चांभार, इनामदार, सावकार, मांग वेगवेगळया जाती-जमातीचे लोक गावाशी विशिष्ट अशा धाग्यांनी बांधले गेले आहेत. अनेक कारणांनी, संबंधानी ही सर्व मंडळी एकत्र येत असतात. एकमेंकांना साहय करत असतात. एकमेंकांचे हितसंबंध, सुख-दुःख, राग-लोभ ठेवत असतात. एकमेकांना व्याजाने पैसे देऊन डबल पैसा उखळणारे सावकार मंडळीही या समाजात दिसून येतात. अशा अनेक प्रकाराने जाती-धर्माने 'झोंभी' तील समाज नटलेला दिसून येतो.

## शिक्षकांना समाजात असणारे स्थान

शाळेमध्ये असताना लेखकाला अनेक नमुन्याचे अनेक मास्तर लाभले. त्यावेळी थोडयापगाराभावी मास्तरांची होणारी कोंडी तसेच या मास्तरांचा विद्यार्थ्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन खूप वेगळा होता. काही मास्तर प्रामाणिकपणे आपल्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांना करून देत. तर काही मास्तर आपल्या विचित्रपणामुळे सर्वांनाच तापदायक होत. 'पूर्वी शिक्षक मुलांना खूप मारत तरीही पालकांची तक्रार नसे त्यावेळी लोकांची अशी धारणाच होती की, माराशिवाय चांगले शिक्षण मिळत नाही आणि शिक्षकही त्यावेळी प्रामाणिकपणे शिक्षणदानाचे काम करीत असत. एक दोन इयत्ता होताच बरेच विद्यार्थी शाळा सोडत याला दोन कारणे एक म्हणजे शिक्षकांचा मार, दुसरे म्हणजे

सामान्य माणसांची परिस्थिती बेताची असल्यामुळे आपल्या कामात आईवडिलांना मुलांची जरूरी भासे." [२] 'सारे प्रवासी घडीचे' मधील पावटे मास्तर हा विचित्र वागणारा मास्तर पहिल्याच दिवशी तो वेगवेगळया जातीच्या मुलांना वेगवेगळे बसवतो. मराठयांच्या मुलांना जानवे घालण्यास सांगतात. शेवटी गावातील लोकच त्याला गावातून कट करून हाकलून देतात. असे विचित्रपणामुळे प्रसिध्दीला आलेले अनेक जसे होते तसेच प्रामाणिकपणे शिक्षणदानाचे काम करणारे शिक्षकही होते.

उच्चवर्णीय शिक्षकांमुळे दलित मुलांच्यावर खूप अन्याय झाला. 'बलुत' मधील दया पवार यांना ते काळे म्हणून शिक्षक त्यांना नाटकात काम देत नाहीत. 'उपरा' मधील लक्ष्मण शाळेत गेल्यावर त्याला कोणी शिवत नाही, कोणी खेळायला घेत नाही. तर मास्तरही त्याला टोचून बोलतात. 'तराळ-अंतराळ' मधील शंकरला उच्चवर्णीयाच्या पहिल्या रांगेत बसला म्हणून शिक्षक खूप मारतात. अशा अनेक दलित मुलांना शिक्षकांच्यामुळे खूप मानसिक त्रास झाला तर काही शिक्षकांच्या प्रेरणेमुळे, आर्थिक साहय्यामुळे ते पुढे शिकू शकले.

लेखक मराठी शाळेत असताना जिन्याजवळच्या खिडकीतून बाहेर बघितले म्हणून निंबाळकर मास्तर मारतात. तर अक्कोळकर मास्तर यांच्यामुळे त्यांना अनेकदा मानसिक त्रास सहन करावा लागतो. लेखकाच्या एकाच हातावर पाच-सहा छडया मारणारे काजी मास्तर. तर लेखकाच्या संवेदनशील मनाला घडविणारे रणदिवे मास्तर, कवितेला प्रेरणा देणारे, अभ्यासाला प्रोत्साहन देणारे न. वा. सौदलगेकर, नाईक मास्तर यांनी विविध स्तरातील संस्कार केले. त्यांच्या अमूर्त मनाला चेतना देऊन मूर्त करण्याचा प्रयत्न केला. कविता करण्यासाठी त्यांना खरी प्रेरणा रणदिवे, सौदलगेकर यांनी दिली, त्यांचा आत्मविश्वास वाढविला. नकला, नाटयछटा या गुणांचा विकास तु. बा. नाईक तर चित्रकलेची आवड सणगर यांनी त्यांच्यात खोलवर रूजविली. अनेक जाती-धर्माचे मित्र त्यांना लाभले. बापू कोळी, माने, वसंत पाटील, मेरवाडे यांच्या अंगी अनेक कलागुण होते. शाळेमध्ये असताना अनेक जाती धर्माची मुले एकत्र येऊन खेळत. माळावर जनावरे चारावयास गेल्यावर तेथे आंब्याच्या कोया, खजुर-खारकीच्या बिया, काडयाच्या पेटीची चित्रे, अचुके कण्हे-या, पेन्सिलचे तुकडे, कोपर बटणे इत्यादी खेळ खेळत होते.

## समाजातील श्रध्दा-अंध्दश्रध्दा

'झोंबी' मध्ये अनेक ठिकाणी श्रध्दा अंध्दश्रध्दा दिसून येते. लेखकाचे वडील रतन जकातेची श्रध्दा आप्पावाडीच्या देवावर हलसिध्द आप्पावर आहे. त्याचबरोबर नरसोबावाडीच्या दत्तावरही श्रध्दा आहे. ज्यावेळी चहुअंगानी त्याचे पाय आखडले जातात.

त्यावेळी तो देवावर हवाला टाकण्याचा प्रयत्न करातो. 'उपरा' मधील लक्ष्मण मानेचे वडील कोणाच्या अंगात भुत शिरले असेल ते काढतात. स्वत: मात्र खूप दारू पितात स्वत:च्या मुलीला बरे करू शकत नाहीत. त्याची काळूबाईवर श्रध्दा असते. धंद्यात व संकटातून काळूबाईच सुटका करते अशी श्रध्दा लक्ष्मणच्या वडिलांची होती.

यादवांच्या वडिलांची जमीन गेल्यावर त्यांना अनेक दृष्टांत पडतात. त्यावेळी त्यादृष्टांताचा अर्थ वास्तवाशी लावण्याचा प्रयत्न ते करतात. त्यांची देवावर अतिशय श्रध्दा असते. यासाठी ते अनेक वेळा लांब लांबच्या देवाला जाऊन आलेले असतात. ग्रामीण भागात सर्वत्रच आपल्याला देवावर लोकांची श्रध्दा असलेली दिसून येते. आपले काही बरे वाईट होते हे सर्व देवामुळेच होते अशी ठाम श्रध्दा ग्रामीण भागातील लोकांच्यात असते. गावातील असणारे सवर्ण दलितांना कार्यक्रमाच्या वेळी जवळ घेत नाहीत. पण एखाद्याच्या अंगात आले. आजारी असेल तर मात्र दलितांच्यातील कोणीही बुवा असो त्याला मात्र जवळ करताना दिसतात.

ग्रामीण भागात मोठया प्रमाणात अंध:श्रध्दा दिसून येते. 'झोंबी' मध्ये मास्तर लहानमुलांना भुतांविषयी अनेक गोष्टी सांगत त्यामुळे लहान मुले खूप घाबरत. रात्रीच्यावेळी घराच्या बाहेर पडत नसत. गावात अनेक ठिकाणी पडके वाडे असत तेथे भुते राहतात. सांगून लहान मुलांना तिकडे जाऊन दिले जात नसे. भुत काढणारे नांत्रिक या वाडयात ज्यांच्या अंगात भुत असेल त्याला नेत व बेदम सालडे निघेपर्यंत मारत असत. ग्रामीण भागात उंबराची झाडे असत. त्याची उंबरे किडयासकट खाल्ली की डोळे येत नाहीत अशीही समजूत होती. तसेच वाटेने जाताना उंबराच झाड लागले आणि उंबराखाली पडलेले उंबर खाल्ले नाही तर चांगले चुंगले खायला मिळत नाही अशा अंध:श्रध्दा ग्रामीण भागात होत्या. 'मुक्काम पोरूट देवाचे गोठण' मधील माधवला आपल्या मनाविरूध्द जातिप्रथेप्रमाणे पूजाअर्चा, दारू पिणे, भगताकडे जावे लागते. 'उपरा' मध्ये कैकाडी समाजात माणसाला येणारे आजारपण एकतर भुताने पछाडणे अथवा देवाचा कोप मानला जातो. काळूबाईच्या यात्रेला या समाजातील लोक कर्ज काढून यात्रा साजरी करताना दिसतात. 'काटयावरीच पोट' मध्ये मांग समाजातही भूतप्रेत विषयक अंध:श्रध्दा आढळतात. भूताला पळविण्यासाठी तुला रामाची धुई असा मंत्र वापरला जातो. साबाजी व उदखानबाबा ही त्यांची दैवत दिसून येतात. 'गबाळ' मध्ये कुडमुडे जोशी ही भटकी जमात आहे. हे लोक पिंगळा जोशी म्हणून ओळखले जातात. कारण यांना पिंगळा पक्षाची भाषा समजते अशी अंध:श्रध्दा आहे याचे भविष्य खरे ठरते असाही समज ग्रामीण भागात दिसून येतो. जो पिंगळा आपणाला संपत्तीच्या शिखरावर उभ करतो तो भाकरीच्या तुकडयासाठी दारोदार भीक मागतो तो स्वत:साठी संपत्ती का निर्माण करू शकत नाही हे आडाणी व अंध:श्रध्देने ग्रसलेल्या ग्रामीण भागातील लोकांना कळत नाही.

'तांडा' मधील जातपंचायत एखाद्याला शिक्षा करण्यासाठी ताजी हातभट्टी आणण्यास सांगत ती सर्वांना लहान मोठयांना घ्यावी लागे. यांचा भुतप्रेतावर विश्वास असे.

अशा अनेक अंध:श्रध्दा ग्रामीण भागात दिसून येतात. यामुळेच ग्रामीण भागातील लोकांचे हाल होत याचा फायदा घेणारे अनेक बुवा ग्रामीण भागात वावरताना दिसतात. दारिद्रय व अडाणीपणाचा फायदा घेऊन देवाच्या नावाखाली ग्रामीण भागात मोठयाप्रमाणात भोंदूगिरी चालताना आपणाला दिसून येते.

## समाजात जोगतिणीला असणारे स्थान

समाजात जोगतिणीना अतिशय खालच्या दर्जाचे स्थान आहे. या 'जोगतिणी' देवीच्या नावाने भीक मागतात. जोगतिणीची यल्लम्मादेवीवर अगाध श्रध्दा असते. त्यातूनच त्यांची विचित्र परिस्थिती, घरे, आर्थिक परिस्थिती, त्यांच्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्या सवयी, अंगात येणे, भविष्य कथनावर असलेला विश्वास यामुळे त्यांचे जीवन उध्वस्त होते. केसात जटा झाल्या की आई वडिल खुल्या अंध:श्रध्देपोटी मुलीला देवीला सोडतात. 'चौडक' मधील सुलीला असेच तिच्या आई-वडिलांनी देवीला सोडल. तिच्या भविष्याचा विचार न करता तिला आपणहून देवीला सोडतात. घरोघरी देवीचा जोगवा मागत असताना तारूण्यात असणारी सुली लोकांच्या वासनेचा बळी ठरती. देवीसाठी जोगतिणीला पाच घरे मागावी लागत. अशी अंध:श्रध्दा रूढ होती. 'झोंबी' मधील लेखकाचे वडिलांच्या गल्लीत, एका बोळात रखमा नावाची जोगतीण राहत होती. तिला मूल नव्हते. लेखकाचे वडील तेथे जाऊन पुष्कळ वेळा गप्पा मारत बसत असत. त्यांनी तिच्याशी मैत्रीचे संबंध ठेवलेले होते. अशा अनेक लोकांचे संबंध जोगतिणीशी असत. यल्लू जोगतिण ही धनगरी समाजातील देखणी जोगतिण होती. तिला एका डॉक्टराने ठेवली होती. समाजातील अशा अनेक उच्चभ्रू लोकांनी अशा प्रकारचे संबंध ठेवले होते. दत्त सावकारानंही आपल्या बायकामुलांना घरातून हाकलून एक नायकीण घरात आणून ठेवली होती. जो पर्यत हया जोगतिणी तारूण्यात आहेत तोपर्यतच त्या समाजातील लोकांच्या वासनेच्या बळी ठरत होत्या. म्हातारपणात जोगतिणीचे खूप हाल होत. त्यांना उपजिविका सुध्दा करता येत नाही. म्हणून शेवटी हया भविष्य सांगणे, भुत उतरण, जादूटोणा करून लोकांना फसवून आपला उदरनिर्वाह करत असतात.

वर्षातून एकदा गावाच्या बाहेर असणा-या यल्लमाच्या देवळाजवळ या जोगतिणीची जत्रा भरते. लेखक म्हणतात "कागलातल्या आणि आसपासच्या दहा-वीस गावावरच्या जोगतिणी तिंथ येत. प्रत्येकीचा एक एक ताफा असे. जगाच्या मध्यभागी यल्लमाचा मोठा टाक बसवलेला असे तिच्या नाकात मोत्याची नथ असे ." [३] असा थाट त्यादिवशी

जोगतिचीचा असे. वर्षातून एकदाच जत्रा असल्यामुळे त्यांच्या उत्साहाला पारावा राहत नाही. प्रत्येक जोगतिण नटून थटून येत असे. लेखक म्हणतात "जगाच्या भोवतीन जोगतिणींची गाणी सारखी चालत. सगळ गाव ओला नि वाळला असा दुहेरी नैवेद्य नेई. सांजचं सगळया जोगतिणीचा ओला नैवेद्य म्हणजे भाजी, भाकरी, भात इत्यादी सुक जेवन एकत्र केल जाई नि सगळया गावाला ते प्रसाद म्हणून वाटत जाई. रस्त्याच्या दोन्ही कडेन लांबच लांब गोरगरिबांची पंगत बसे नि ते अन्न त्या पंक्तीला वाटल जाई." [४] आपल्या सुरेल आवाजात देखणी यल्लू जोगतिण गाण म्हणत असत. जोगतिणी काळया – बेंद-या असल्या तरी नटलेल्या असल्यामुळे न्हाऊन नीटनेटके केस विंचरलेल्या असल्यामुळे चांगल्या दिसत. जत्रेच निमित्त होऊन अनेक सौदे या जत्रेत होत असत. अनेक पैसेवाले, हौशी वतनदार लोक देखण्या तरूण जोगतिणी हेरून त्यांना 'ठेवत' किंवा त्यांच्याशी संबंध जोडून राहत. तालूक्यातील अनेक जोगतिणी आपल्या तरूण पोरीबाळींना घेऊन तेथे येत असत.

समाजात असणारे जोगतिणीचे स्थान हे रखेलीच्या स्वरूपाचे आहे. तिच्या दारिद्रयाचा, परिस्थितीचा गावातील अनेक पैसेवाले लोक फायदा घेत असतात. तिला माणूस म्हणून किंमत न देता ती एक भोगवस्तू असून वापरून वापरून जुनी झाली की टाकून द्यायची वस्तू आहे असे पैसेवाले लोक समजत असत.

## अल्लावा नि गैबीचा उरूस

अल्लावा नि गैबीचा उरूस कागलात मोठया उत्साहानं लोक साजरा करत. त्यात सगळया जाती धर्माचे लोक सामील होत. अनेक खेडोपाडी असे उरूस व जत्रा भरत त्यामुळे हिंदू-मुस्लिम ऐक्य साधले जात. राजाचे कुर्ले या खेडयात होणारी यात्रा ही ऐक्याचेच प्रतिक आहे. हिंदू-मुसलमान मिळून ही यात्रा उत्साहात साजरी करतात. ईश्वराला नवस सायास करतात. वर्षातून यात्रा उरूस एकदाच येत असल्यामुळे गावातली लहान थोर मंडळी नटून थटून उत्साहान यात्रा साजरी करत असत. लेखक म्हणतात "आमच्या घरात 'पीर' बसत या पिराला गावात मोठा मान असे. बायका त्याला नवस बोलत. त्याच नांव आपल्या मुलांना ठेवत. 'पीर ' म्हणूनच त्याला ओळखल जात असे. बाकीच्यांना 'नालसाब' म्हणून ओळखले जाई. हया अल्लाव्यात सगळया जातीधर्माचे लोक सोंग काढत सोंग काढणा-याला गावातले पाटील वतनदार, व्यापारी , सावकार वाणी पैसे देत असत."

उरूसात नवीन कपडे घालून लोक आनंदान जत्रेत खरेदी करत. जत्रेत नायकिणीचा नाच होई, गैबीला पाच दिवस गल्फ घातले जाई. तो गावक-यांचा मान

असे. वाद्य वाजवत पुढे नायकिनी नाचत बाजारातून फेरी काढत असत. उरूसाच्या वेळी हिंदू-मुस्लीम यांच्यामध्ये असलेली ऐक्याची भावना आपल्याला स्पष्टपणे दिसते. अशीच ऐक्याची भावना गुरू नानक यांनी केली ते हिंदू-मुस्लिम यांच्यात फरक न मानता हिंदू-मुसलमान हे दोघेही परमेश्वराचेच आहेत. त्यांच्यात अज्ञानामुळे व्दैतभाव उत्पन्न झालेला आहे. तो नष्ट केला पाहिजे. यात्रा, उत्सव उरूस यांच्यामुळे हा व्दैतभाव नष्ट होईल म्हणून असे उत्सव साजरे होणे आवश्यक आहे. यात्रा, उत्सवामध्ये आपल्याला समूह मनाचे दर्शन घडते. एक सामूहिकवृत्ती त्या ठिकाणी असलेली आपल्याला दिसते. 'सारे प्रवासी घडीचे' मध्ये लहान मुळे शिमग्याच्या वेळी वाघ, कोल्हा यांची सोंगे काढत शेवटी त्यांना मोठया माणसांच्याकडून पैसे मिळत. ग्रामीण भागात अशा अनेक यात्रा, उत्सवाच्या वेळी गावातील लहान मुलांपासून मोठयांपर्यंत या उत्सवात भाग घेत. यामुळे गावातील सर्व लोक एकत्र येत त्यांच्यात ऐक्य निर्माण होत असे.

गांधीजीच्या वधामुळे सर्व भारत पेटला. गावोगाव उच्चवर्णियाची घरे, वाडे जाळले. याचा फायदा घेऊन बहुजन समाजातील अनेक मंडळींनी घरांची लुटालुट केली. अनेकांनी उच्चवर्णियाना आपल्या घरात आसरा देऊन त्यांच्या जमीनी, घरे आपल्या नावावर करून घेतल्या 'व्हॉलंटरी शिक्षक - आठवणी ' मधील शंकर यशवंत भागवत म्हणतात" लोकांनी गांधीजीच्या खुनानंतर उच्चवर्णियांची घरे जाळली याचे कारण असे नव्हे की, गांधीजीच्या खुनाचा सूड त्यांना उगवावयाचा होता. महात्मा गांधीच्या खुनाबद्दल प्रत्येक भारतीयास दुःख होतेच. पण त्यासाठी उच्चवर्णियांची घरे जाळण्यास सामान्य जनतेला उच्चवर्णियांनी आपणावर कित्येक वर्ष केलेल्या अन्यायाचा सूड घ्यायचा होतो." [६] तर 'सारे प्रवासी घडीचे' मध्ये जयवंत दळवी म्हणतात "गांधी वधानंतर आमच्या गावातील लोकांना उच्चवर्णियांच्या घरातील काय लुटायचे ? हा प्रश्न पडतो. लंगोटीवाल्याने पंचाला हात घालायचा ?' [७] गांधीवधामुळे संपूर्ण ग्रामीण भागातच लुटालुट झाली. याच्यामुळे उच्चवर्णियांना खूपच त्रास सहन करावा लागला.

## बालविवाहाची प्रथा

'झोंबी' मध्ये लेखकाच्या वडिलांचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी झाले. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे वय एक वर्षाचे होते. लेखकाच्या अनेक बहिणीची, मामांची व इतर नातेवाईकांची लग्ने लहान वयातच झालेली दिसून येतात. आजही राजस्थान सारख्या देशात बालविवाह होताना दिसून येतात. याला कारण समाजातील अडाणीपणा, दारिद्रय, आर्थिक परिस्थिती यामुळे ग्रामीण भागातील लोक मुलीची लवकर लग्न करून देत होती. 'उपरा' मधील लक्ष्मण शाळेमध्ये असतानाच लग्न करण्याचे घरातील आई-वडील तरवतात. पण

त्यांच्या निर्धारामुळे ते होत नाही. ग्रामीण भागात बहुजन समाजातील व दलित समाजातील मुला-मुलींची लग्ने लवकर करत असत. यामागे त्यांचा आडाणीपणा दिसून येतो. आपला मुलगा अथवा मुलगी आपली समाजात बदनामी करू नये म्हणून त्याला बंधनात लवकरात लवकर अडकविण्याचा प्रयत्न आई-वडिल करताना दिसतात. मुला-मुलीच्या मनाचा, त्यांच्या ध्येयांचा विचार आपल्या आडाणी, आडमुठेपणामुळे करत नाहीत.

## गु-हाळाचे दिवस

गु-हाळाच्या दिवसामध्ये ग्रामीण भागात लोकांची धांदल उडत असे. शेतातील कामे आटपून गु-हाळाकडे लक्ष द्यावे लागत असे. या गु-हाळासाठी तेरा ते चौदा कामगार लागतात. यामध्ये गूळ तयार करणारा गुळव्या हा फकत अनुभवी असावा लागतो. माणसे गोळा करण्यासाठी शेतक-याला खूप त्रास होतो. गुळव्याला या धंद्यात फार मोठया कष्टाची तयारी ठेवून काम करावे लागते. शेतक-याला शेतीच्या कामाकडे लक्ष देऊन गु-हाळाकडे लक्ष द्यावे लागते. माणसे गोळा करणे, घाणा सुरू करणे, मोडतोडीची दुरूस्ती करणे यासाठी मोठा खटाटोप करावा लागाते. त्यासाठी पैसे उभे करावे लागतात. हे काम त्रासाचे आणि जिकीरीचे असल्यामुळे या दिवसात लोकांना खूप त्रास होत असे. 'झोंबी' मधील लेखकाच्या वडिलांना गु-हाळ उभे करण्यासाठी पैसा उभा करावा लागला. त्यासाठी घरातील पाड विकाव लागले. ज्या शेतक-याची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. त्याला गु-हाळ उभे करताना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. पण ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे. त्यांना अनेक कामगार मिळत आणि गु-हाळही व्यवस्थित चालत असे. सध्या साखरेपेक्षा गुळाला जास्त मागणी आहे. "पूर्वी सारख्या गु-हाळबंदीचा कायदा आज नाही. नियमाने गु-हाळाला साखर आयुक्तांची परवानगी लागते. परंतु दप्तरदिरंगाईमुळे ही परवानगी लवकर मिळत नाही. त्यामुळे शेतकरी तहसीलदारांची हंगामी परवानगी घेऊन गु-हाळे चालू करतात."[८] "आजही अनेक खेडोपाडी साखरेपेक्षा गुळालाच जास्त महत्व आहे. कमी किमंतीत मिळत असल्यामुळे ग्रामीण भागात तो परवडणारा आहे.

## कोर्टकचे-यांचे वातावरण

शेतजमिनीविषयीचे कुळाला संरक्षण देणारे कायदे लागू झाल्यामुळे ग्रामीण भागात हवे-दावे सुरू झाले. यामुळे कोर्टकचे-यांचे फेरे ग्रामीण भागातील लोकांना मारावे लागत होते. कुळ कायदा झाल्यावर लेखक म्हणतात "सुशिक्षित, पैसेवाल्या नि कोर्टकचे-यात

ओळखीपाळखी , संबंध असलेल्या हुशार शेतमालकांनी त्या दरम्यानची कबुलायतीची मुदत संपल्याबरोबर कुळांना बाहेर काढले."[९] शेतमालक सत्तेचा जोरावर दुबळया, अडाणी शेतक-यांना दमदाटी देऊन सक्तीने नोकरनामे, राजीनामे लिहून घेऊ लागले. गोपातात्यांनी आपल्या फाळ्याच्या जमिनीचे 'सुरक्षित कुळ' म्हणून योग्य तो फाळा ठरवून द्यावा म्हणून कोर्टात अर्ज केला. गोपातात्याप्रमाणे लेखकाचे वडिल ही आपल्या मालकाविरूध्द कोर्टात खटला लावतात आणि जिंकतात ही. लेखकाचा मळा मालकाने ताब्यात घेतल्यावर लेखकाचे वडील त्यांच्याविरूध्द कोर्टात केस घालतात. त्यासाठी अनेक वेळा ते कोर्टात जातात त्यांच्या अज्ञानी अडाणीपणाचा फायदा घेऊन मालक केस जिंकतात. मालक कोर्टतील वकीलांना पैसे देऊन ख-याच खोट करतो आणि केस जिंकतो. ग्रामीण भागातील लोकांच्या अडाणी अज्ञानपणाचा फायदा असे अनेक श्रीमंतांनी घेऊन आपल्या जमीनी काढून घेतल्या. तरीही ग्रामीण भागातील लोक दैवावर हवाला ठेऊन निकाल आपल्या बाजूनेच लागेल याची खोटी स्वप्ने पहात असलेले आपल्याला लेखकाच्या वडिलांच्या वर्तनावरुन दिसून येते.

## खेडयातील सामुहीक जीवन

यात्रा, उत्सव यांच्यामुळे सर्व लोक एकत्र येताना दिसतात. तसेच मळयात काम करताना सर्व जाती धर्माचे लो समुहाने काम करतात. लग्न समारंभ, उ-तर कार्याच्या वेळी सर्वसमाज एकत्र येताना दिसतो. गावात असणारे एखादे मंदीर त्या मंदीरात भजनाच्या निमि-ताने अनेक लोक एकत्र येतात. ' सारे प्रवासी घडीचे' मध्ये 'दशावतार' नाटकाच्यावेळी अनेक जाती धर्माचे लोक वेगवेगळी सोंगे घेऊन नाटकात काम करतात. यल्लमाच्या यात्रेच्यावेळी अनेक गावच्या जोगतीनी एकत्र येतात व आपल्या प्रश्नांचे निरसन करतात. उरुसाच्या वेळी हिंदू-मुस्लीम लोक एकत्र येऊन उत्साहाची मजा करताना दिसतात. यात्रेच्या निमि-ताने अनेक तमासे गावात होत. यावेळी रात्री वरातीला रात्रभर जागून दांडपटयाचा खेळ चालत असे तो पाहाण्यासाठी अनेक गावचे लोक एकत्र येत. अनेक नवीन लग्न झालेल्या जोगतीणीची गाणी यावेळी होत असत.

धनगरवाडयात धनगरांची पारंपारिक बिरुबाचा माळ चाले त्यावेळी अनेक गावचे धनगर एकत्र येत असत. शेतीच्या गु-हाळाचेवेळी अनेक गावचे वेगवेगळया जातीधमाचे लोक गु-हाळावर कामाला येऊन सामुदायिकपणे काम करताना दिसतात.

'झोंबी' मध्ये येणारे सामाजिक दर्शन विविध पातळीवरचे आहे. ग्रामीण भागात असणा-या रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, चालीरीती, आचार-विचार, संस्कृती, जाती-जमाती, ग्रामीण भागातील लोकांच्या मनावर असणारे अनेक ताण-तणाव, समूहमनाची भावना

दिसून येते. ग्रामीण भागातील हेवे-दावे, व्देष, मत्सर, यातच तेथील लोक अडकून पडल्याचे आपल्याला दिसून येते.

## 'नांगरणी' मधील सामाजिक विचारांचा वेध

' नांगरणी' मध्ये येणारा सामाजिक स्तर हा खालच्या स्तरातून वरच्या सामाजिक स्तरात जाऊन पहाणा-या संवेदनशील तरुण मनाची आहे. तशीच समाजात वावरणा-या अशा अनेक तरुण मनाचीही असू शकेल.

' नांगरणी ' मध्ये प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत असताना लेखकाला सहाय्य करणारी माणसे सामाजिक, सांस्कृतिकदृष्टया वेगळया आणि त्यांच्यापेक्षा वरच्या स्तरातील व वर्गातील होती. अशा सुशिक्षित व्यक्तीशी संघर्ष टाळता येत पण त्या व्यक्तीना टाळता येत नसे.

"नांगरणीत प्राधान्याने व्यक्ती विरूध्द परिस्थिती असा संघर्ष चित्रित होत असल्याने बाहय परिस्थितीचे चित्रण अपरिहार्यच ठरते. तथापि येथे व्यक्ती हे केंद्र आहे. व्यक्तीभोवतीचे आवश्यक तेवढे बाहय परिस्थितीचे चित्रण येथे येते. लेखक व्यक्ती आणि कुटुंब या परिघाबाहेर सहसा जात नाही. समकालीन चळवळीचे राजकीय वातावरणाचे चित्रण काही प्रमाणात येते. त्याचे प्रयोजन व्यक्तीभोवतीचे पर्यावरण हेच राहते." [१०]

गरिबीतून शिकणा-या मुलांच्या स्वप्नांना शिक्षक योगय प्रेरणा देतीलच असे नाही. हेडमास्तर लेखकाला शिक्षणांसाठी प्रेरणा न देता कोठेतरी कारकूनाची नोकरी कर म्हणून सांगतात. उलट उच्चवर्णिय मुलांना डॉक्टर, इंजिनिअर, एल.एल.बी. कर म्हणून प्रोत्साहन देतात. तर अंधश्रध्दा निर्मूलनाचे नामवंत कार्यकर्ते जिद्दीने आर्थिक परिस्थितीला तोंड देऊन शिक्षणपूर्ण करून प्राध्यपक झालेल्या विद्यार्थ्याला खणावळ घालण्यास सांगतात. मात्र आपल्या विद्यार्थिनीला एका लोकल संस्थेत प्राध्यापकाची नोकरी मिळवून देतात. हा अनुभव सार्वत्रिक स्वरूपाचा आहे.

वर्गात प्रामाणिकपणाचा आव आणणारे गुरूजी मुलांना चहापासून वंचित करतात. मात्र स्वत:घरी चहा पितात. शाळेतील विद्यार्थ्यांना बाजारातून भाज्य किराणा आंणून देण्यास सांगतात यामुळे विद्यार्थ्यांच्यात काही वेळा गुरूजीच्या विषयी आपुलकी राहत नव्हती.

समाजाविषयी वरवर तळमळ दाखविणारे अनेक जण असतात. पण प्रत्यक्षात मात्र त्यांचे कार्य शून्य असते. याचा अनुभव लेखकाला नोकरी शोधताना अनेक वेळा आला. या उलट उच्चवर्णियांना मात्र शिक्षण थोडे झाले तरी नोकरी मिळत होती.

विद्यार्थ्यांना होस्टेलमध्ये रहात असताना पहाटे पाच वाजता उठावे लागे, स्वयपाक, झाडलोट, पाणी भरणे, झाडांना पाणी घालणे, धान्य निवडणे, संडास साफ करणे ही सर्व कामे करावी लागत होती. यामुळे उच्चवर्णिय विद्यार्थी नाराज होत होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील मुलांनी शिकावे म्हणून 'कमवा आणि शिका' या योजनेखाली विद्यार्थ्यांना शिकण्यास प्रोत्साहन दिले. त्यानी होस्टेल काढले ते सर्व जाती धर्माच्या मुलांनी एकत्र राहून स्वत:च्या बळावर शिक्षण घेऊन आपली प्रगती करावी. उच्चवर्णिय विद्यार्थ्यांना अशी कामे करण्यास आवडत नव्हत. यामुळे अनेकदा होस्टेलमध्ये संघर्ष होत असे.

'सत्यकथा' सारखी मासिके व वृत्तपत्रे शिक्षकांच्या व उच्चवर्णिय लोकांच्या घरी येत होती. आज गावोगावी सार्वजनिक ग्रंथालय झाल्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना मासिके व वृत्तपत्रे वाचण्यास उपलब्ध झाली आहेत.

शिक्षणासाठी लेखक रत्नागिरीला जाताना त्याला आर्थिक मदत करणारी माणसे ही खालच्या स्तरातीलच आहेत. शाळा, कॉलेज मध्ये कडक शिस्त होती. शिक्षकांना समाजात खूप मान होता. शिक्षक आपणास शिक्षा करतात ते आपल्या भल्यासाठी अशी मुलांची धारणा असे. शिक्षकसुध्दा मुलांशी सूड बुध्दीने वागत नसत. तरीही शिक्षकांच्या मारामुळे शाळेत गळती प्रमाण वाढले होते. आज गळतीचे कारण प्रामुख्याने बेकारी हेच दिसून येते. दिवसेंनदिवस बेकारी वाढत असलयाने पालकांचा शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत करणारी मंडळीही बहुजन समाजातीलच असत. त्यांना गरीबीतून धडपडणा-या मुलांचे कौतुक वाटत. आपल्या थोडयाफार पैशातून थोडीशी मदत मुलांना करत होते.

शाळा कॉलेजप्रमाणे होस्टेलमध्येही कडक शिस्त होती. होस्टेलच्या रेक्टरचे सर्वजण ऐकत होते. चहाचे व्यसन वाईट म्हणून सकाळी भिजवलेले शेंगदाणे, डाळ, पोहे नास्ता म्हणून मुलांना दिले जात होते. शिक्षक मात्र घरी चहा पीत होते.

एकीकडे समाजात लेखकासारख्या हजारो तरूण मुलांना कॉलेजची 'फी' द्यायला पैसे नसतात. सतत संघर्ष करून पैसे मिळवून ही मुले कॉलेज शिकतात. या उलट आईवडिलांच्या पैश्यावर कोणतेही कष्ट न करता आरामात ज्ञानार्जन घेऊ शकत नाहीत. उलट अत्यंत कष्टात शिकणा-याला मात्र पुढे जाऊ दिले जात नाही. त्याचा पाय ओढण्याचा प्रयत्न केला जातो.

भाऊंच्याबरोबर लेखक पाली, राजापूर, फोंडा, गोपूरी, मालवण, कोळले, मसुरे, आंगणेवाडी इत्यादी ठिकाणी पदयात्रा केल्यावर लेखकांना त्या गावातील लोकांची दिनचर्या जवळून बघण्याची संधी मिळाली. लेखक म्हणतात " दादा सर्वोदयाचे कार्यकर्ते पण सकाळी म्हैस हिंडवून आणत. संध्याकाळी भूदान - सभेत ब्राम्हणभटजीवर कडाडून टीका करत गावक-यांच्या खुळया समजुतीवर हल्ले करत. पण लग्नसमारंभादी मंगल कार्याला स्वत:च भटजी म्हणून जात." [११] अशा अनेक मंगल समारंभाला भटजी जात होते. तरीही श्रमदानाला सर्वात पुढे टिकाव घेऊन चालू लागत ते गावक-यात मिसळून काम करत. लेखकाचे अनेक उच्चवर्णिय मित्र त्यांना जातीय अंतर जाणवून देणारी वागणूक देत असत. अशा प्रकारची वागणूक अनेक दलित तरूणांनाही शिक्षण घेताना जाणवली. म. फुले यांना ही जातीयतेची झळ पोहचली होती.

"शेतक-याचा असूड" मध्ये म. फुले यांनी शेतक-याच्या घरातील वर्णन अतिशय वास्तवरीतीने केले आहे. ते म्हणतात "माजघरात उंच खोल जमीन असून तेथे दळण पाखडल्याचा वैचा पडला आहे. कोप-यात कुजक्या कांद्याचा ढीग पडला असून त्याचा कुबट वास घरात पसरला आहे. मध्ये खुल्या जमिनीवर एक जख्ख झालेली म्हातारी खालीवर पासोडी घालून कन्हत पडली होती. घरातील कानेकोपरी चुना-तंबाखु खाणा-यांनी पिचका-या मारून तांबडेलाल केले आहेत. एका कोप-यात जाते आहे दुस-या कोप-यात उखळाशेजारी मुसळ उभे केले आहे. दाराच्या कोप-यात केरसुणी असून कच-याचा ढीग साचला आहे. चुलीच्या भाणुशीवर खरकटा तवा, दूधाचे खरकटे मडके, घोंगत पडले आहे. चहुकडे भिंतीवर ढेकूण पिसा मारल्याचे तांबूस रंगाचे डाग पडले आहे. एका देवळीत तेलाचे गाडगे, दातवणाची कळी, शिगटाची फणी, तलखादी आरशी, कुंकवाचा करंडा इत्यादी आहे. रात्री लावण्यासाठी देवळीच्या किना-यावर दगडाचे दिवे आहेत. दुस-या दिवळीत पिठाच्या टोपल्या शेजारी खाली डाळीचा कणूरा व शिळया भाकरीचे तुकडे. तिस-या देवळीत भाकरीच्या टोपल्या शेजारी हिरव्या मिरच्या लसूण, कोथिंबीर, दूधाची शिप, आंब्याच्या करंडया पडल्या आहेत. त्यावर असंख्य माशा बसत होत्या. जागोजाग घोडीची लगाम, घोगीर, वळी व रिकामी तेलाची बुधली टांगली आहे. कच्या विटाचा देव्हारा एका कोप-यात आहे. नांगराचा फाळ, कुळवाच्या फाशी, लवंगी काठी व पहार एका कोप-यात ठेवलेले आहेत. जागोजाग उंदरांची अनेक बिळे आहेत. घरातच गोठा असून जनावरांच्या शेणामुताच्या वासाची दुर्गंधी सर्वत्र पसरली आहे. त्यातच स्वयपाक व जेवण चालत असे.'' [१२] १८ व्या शतकातील शेतक-याच्या परिस्थितीचे चित्रण फुले यांनी केले आहे. आजही या स्थितीत बदल झालेला नाही. लेखक भूदान चळवळीतून कोकणात पदयात्रेस गेला. तेव्हा त्यांना अनेक अनुभव आले. त्यांनी शेतक-यांचे जीवन जवळून पाहिले. त्यांच्या घरातील चित्रणही लेखकांने अतिशय

वास्तवपूर्ण केले आहे. ते म्हणतात " सामान्य माणसाच्या घरादारात दारिद्रय भरलं होतं. त्याच्या गवताच्या झोपडीत गेलो तर सगळं मोकळं मोकळं दिसे. चार दोन मडक्यापलीकडं, आंथरुण-पांघरुणाच्या चिंध्यावोतरापलीकडं कांही नसे. सगळी राबणारी माणसं पोट म्हातारी झालेली. एकाच्याही तोंडावर रया नाही की गंगावर मांस नाही. तंबाखूची चिमूट दाढेखाली धरुन त्यांनी तोंड चिकटवून टाकलेली. त्यांच्या कष्टाला सुमार दिसत नव्हता. उन्हातान्हात, पावसात, दिवसा-रात्री, थंडीवा-यात राबत होती. तरी उपाशीच राहात होती." [१३] आपले दु:ख दिवसभर केलेले कष्ट विसरण्यासाठी भट्टीच्या दारूचा आसरा हे लोक घेत होते.

कोकणात उघडेबंब देहाने उन्हातान्हात डोंगरावर जमिनीत पहारी, टिकाव मारून जमीन उकटत होते. एवढया कष्टाच्या हालाखीच्या कामातून आपले कष्टाचे काम सोपे व्हावे म्हणून हास्यविनोद करताना दिसतात. लेखकाची आई आपला मुलगा शहर गावी जाणार म्हणून जात्यावर दळण दळताना म्हणते.

" .... सोनं चाललं परगावा ऽ
हिर्वा पोशाख अंगी नवा ऽ
धनी, त्येच्या कपाळी हो ऽ
माझ्या मातीचा टिळा लावा ऽऽ ...." [१४]

अशा प्रकार ओव्या दळत दळताना म्हणून एकप्रकारे आपल दु:ख या जात्याला ती सांगते. ओवी म्हटल्यामुळे तिचे कष्ट श्रम यामुळे हलके होत होते.. या गाण्यांचे स्वर आजही लेखकाच्या मनात घोळताना दिसतात. म्हणून किती हेकेखोर असली तरी त्यांना त्यांची आई आवडत होती.

दिवसभर उन्हातान्हात कष्ट करणा-यांना सर्वोदयी तत्वज्ञान सांगून पटणारे नव्हते. त्यांना जमिनी देऊन उपयोग नव्हता. सर्वोदयी कार्यकर्त्यांची घरे अगत्यशील होती. उच्चवर्णीय मित्र, प्रिन्सिपॉल, शिक्षक यांची घरे मोठी होती. अशा प्रकारची घरे गरिबांना परवडणारी नव्हती.

प्रसार माध्यमे व वृत्तपत्रांनी त्यावेळी समाजात जागृती निर्माण करण्याचे काम केले. ग्रामीण भागात पूर्वी दूरदर्शन कोणाकडेही नव्हता. रेडिओ होते तेही गावात जे पैसेवाले, श्रीमंत होते त्यांच्याकडेच. लेखक म्हणतात " माझ्या श्रृतिका रेडिओवर प्रसारित होत त्यावेळी एका रेडिओभोवती माझ्या घरातील सर्व भावंडे व गावातील इतर मंडळी गोळा होऊन ऐकत होते." [१५]

रेडिओप्रमाणेच वृत्तपत्रांनी त्यावेळी समाजजागृतीचे कार्य केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या मोर्च्यावर मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाईनी निर्घृण गोळीबार केला. त्यात १०५ लोक ठार झाले. सगळे मराठी भाषिक त्यावेळच्या 'मराठी', 'नवयुग' ही वृत्तपत्रे वाचत

होती. यातून या बातमीचे फोटो छापून येत होते. या सारखी वर्तमानपत्रांची वाट ग्रामीण भागात लोक पहात होते. या सारखी वर्तमानपत्रांची वाट ग्रामीण भागात लोक पहात होते. वर्तमान पत्रातील खडानूखडा बातमी सर्वजण वाचत होते. त्यामुळे जनमाणसात याबद्दल जागृती होत होती. सर्वोदय चळवळीचे कार्य लोकांपर्यंत पोहचत होते. त्यावर चर्चा होत होती. यामुळे लोकशाही हळूहळू रूजत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधर्म स्विकारायच ठरवल्यावरही दलितांच्यामध्येही संघर्ष झाला तो परंपरागत हिंदू धर्मच ठेवायचा की बौध्द धर्म स्विकारायचा अशा व्दिधा मन:स्थितीत हे लोक अडकलेले दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केल्यावर त्यांच्या विचारांचा दलित समाजावर कसा परिणाम झाला याचे प्रभावी चित्रण 'तराळ-अंतराळ' मध्ये शंकरराव खरात यांनी केले आहे. दलितांच्या मध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच दलित साहित्याचा उदय झालेला आहे.

आज प्रामाणिकपणे समाजकार्य करून सुध्दा निवडणूकामध्ये पराभवाला सामोरे जावे लागते. तर काही पैसा पेरून त्याच्या जीवावर निवडणूका जिंकतात. हे सामान्य माणूस पहातो पण तो काहीही करू शकत नाही.

विनोबा भावे यांनी कोल्हापूरमध्ये 'अखिल भारतीय सर्वोदय संमेलन' घेतले. त्यावेळी उद्‌भवलेला सीमाप्रश्न त्यांना गौण वाटत होता. परंतु त्यावेळी लोकांच्या मनात सीमा प्रश्न घोंगावत होता. त्यांना त्यावेळी त्यावरच चर्चा हवी होती. म्हणून लोकांनी त्यांची सभा उधळून लावली. लेखक म्हणतात " सामान्य माणसाचे जगण्याचे काही प्राथमिक प्रश्न असतात. ते सोडवून त्याच्या निकडीचं असत त्याशिवाय जगता येणं अशक्य असत." [१६] असे काही ग्रामीण भागातील लोकांचे प्राथमिक प्रश्न असतात जे सोडविण्यातच या लोकांची सर्व शक्ती खर्च पडते. यांचे प्रश्न जोपर्यंत सुटत नाहीत तोपर्यंत या लोकांच्या मनाची अवस्था बिकट होत जाते. त्यामुळे थोरा-मोठयांचे व्यापक, मानवतावादी विचारही धुडकावून लावतात.

शाहु महाराजांनी बहुजन समाजातील मुलांना शिक्षण मिळावे म्हणून शाळा सुरू केल्या. सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी वसतीगृहे सुरू केली. त्यांच्या कार्याला अनेक उच्चवर्णियांनी विरोध केला. अनेक अडथळे आणले. परंतु त्यांनी या अडथळयांना न जुमानता आपले कार्य सुरूच ठेवले. याचा लाभ लेखकाला झाला त्याला शाहु बोर्डिंग कोल्हापूरमध्ये वसतीगृहात प्रवेश मिळाला आणि त्याच्यात शैक्षणिक प्रगती घडून आली.

ग्रामीण भागातील पालक आपल्या मुलांना शिक्षण देण्यापेक्षा शेतावर कामाला लावत. शेती केल्याशिवाय घरी खायला काही मिळणार नव्हते. याला प्रामुख्याने पालकच जबाबदार आहेत असे नाही, तर त्याला घरातील अर्थिक परिस्थिती, रूढी, परंपरा, अज्ञान,

अडाणीपणा जबाबदार आहे. शेती करत मुलांला शिकवावे असे पालकांना वाटत नाही तर मुलाने परंपरागत शेतीच करावी असेही काही अज्ञानी पालकाचें मत असते. लिहायला, वाचायला आले म्हणजे पुरेशे असे ते मानत होते. मुलांच्या भावनांची कदर न करता त्याला कष्टाची कामे लावली जात होती. त्याला इलाज नव्हता. कारण शेती केल्याशिवाय पोटाला अन्न मिळणार नव्हते.

मुलाच्या आग्रहामुळे व हट्टामुळे जर पालकांनी शिक्षणाला संमती दिलीच तर त्याला शेतीप्रमाणेच शहरात येणारे अनुभव ही वेगळया प्रकारचे असतात. वसतीगृहात पहिल्या पंगतीला चांगले चुंगले खायला मिळते म्हणून मुलां-मुलांच्यात होणारे संघर्ष हे प्रामुख्याने उच्चवर्णिय मुलांच्यातच होत. बोर्डिंगमध्ये असणारी मुले खेडयापाडयातील गरिबाघरची, शेतकरी, कुणब्याची, साळया-सुताराची अशा अनेक जातीधर्माची असल्यामुळे ती एकोप्यानं राहत. घरी खायला अन्न मिळत नव्हते. वसतीगृहात शेवटच्या पंगतीत मिळालेल्या अन्नावरही त्यांचे समाधान होई. उपाशी रहाण्यापेक्षा हे अन्न चांगले असा विचार ही मुले करताना दिसतात.

आपल्या घरातील दारिद्रय कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी ते न सांगता दुस-याला कळत असते. लेखक आपल्या घरातील दारिद्रय शहरातील मित्राला दिसू नये म्हणून ते लपविण्याचा असाच प्रयत्न करतो. शहरात राहणारे उच्चवर्णिय गरीब असले तरी त्याची घरे स्वच्छ असतात. खोल्या टापटीप मध्ये असतात. दररोज आंघोळ, स्वच्छ कपडे त्यांच्या अंगावर असत. लहानपणापासून त्यांना घरात चांगले वळण लावले जात त्यामुळे त्यांचे बोलणे, वागणे संस्कृतीला धरून होते. लेखक म्हणतात "ब्राम्हणांच्या अंगावर साधे कपडे असले तरी स्वच्छ असायचे. घर लोटलेले असायचं. सगळयांच्या आंघोळी सकाळी झालेल्या असायच्या. डोक्याला तेल, केस निट विंचरलेले असत. येणा-या जाणा-यांसाठी बाहेरच्या खोलीत बैठक नीट केलेली असे. ग्रामीण भागात मात्र गरिबी केविलवाणी, मळकी धूळ खाणारी नि अस्ताव्यस्त होती. गरिबीतला नि कुणब्याच्या गरिबीतला हा फरक होता." [१७] हा फरक प्रामुख्याने ग्रामीण शहरी यामध्ये दिसून येतो. शहरातील संस्कृती ही माणसाला गरिबीतही नीटनेटक राहण्यास, वागण्यास शिकवते. प्रत्येकजण व्यवस्थित टापटिप वागत असल्याने दुस-याला तसे वागणे आवश्यक असते. ब्राम्हण गरीब असला तरी त्याच्यावर नेटका संस्कार होता. कुणबी दारिद्रयाचे अधिक प्रदर्शन करत होता.

स्त्रियांना पुरूषापेक्षा अधिक कष्ट, श्रम उपसावे लागते. मुले ही देवाघरची देण आहे. म्हणून अनेक मुल होतात. या अनेक मुलांमुळे घरात खाणारी तोंडे वाढतात. यामुळे आर्थिक परिस्थिती अधिकच खालावते. यामुळेच घरात संघर्ष, भांडणे सुरू होतात. प्रगती ऐवजी घराची अधोगती सुरू होते. आज भरमसाठ लोकसंख्या ही देशाची चिंतचे

बाब झाली आहे. ग्रामीण भागात अजून खुळचट अंधश्रध्दा, अडाणीपणामुळे लोकसंख्येत भर पडत आहे. देशात भरमसाठ लोकसंख्या वाढल्यामुळे बेकारी सारखी समस्या देशापुढे उभी राहिली आहे. लेखकाच्या घरी त्यांना अनेक भावंडे असल्यामुळे त्यांना अनेक आर्थिक संकटाना तोंड द्यावे लागले.

लोकसंख्येप्रमाणेच हुंडा ही समस्या भारतात मोठया प्रमाणात आहे. आजच्या अनेक प्रमुख वर्तमानपत्रातून दररोज हुंडयासाठी स्त्रियांचा होणारा छळ किंवा जाळून घेणा-या बातम्या येत असतात. तरीही लोकांच्यामध्ये जागृती होत नाही. हुंडा घेणे हे कायद्याने गुन्हा आहे माहित असून अनेक खानदानी लोक भेट या नावाखाली हुंडा दिला जातो.

बहुजन समाजात तर हुंडयाला अतिशय महत्व आहे. मुलगी किती शिकली, दिसायला कशी आहे. यापेक्षा हुंडा किती देणार याला महत्व दिले जाते. आज 'एडस' सारखी मोठी समस्या देशात असतानाा सुध्दा मुलाचा, मुलीचे रक्त तपासले जात नाही. तर जन्मकुंडली पाहिली जाते. वरून साधा भोळा दिसणारा खानदानी अगर सामान्य याने तरूण असताना केलेल्या चुकीमुळे सर्व संसाराची उधळण होताना दिसते. तरी सुध्दा जन्मकुंडली पाहून लग्न जमत नसेल ते जादा पैसे देऊन जमवून भरमसाठ हुंडा घेऊन लग्न धुमधडाक्यात लावले जाते.

लेखकाची बहिण धोंडूबाईचे लग्न करतानाही तिचा विचार घेतला जात नाही. मुलीला काय विचारायचे? असे म्हणून पालक मुलीचे तिच्या नापसंत व्यक्तिशी लग्न लावतात. यातूनच अनेक आत्महत्या होतात. संसार उद्‌ध्वस्त होताना दिसतात. घरात वडिलांची चालणारी दादागिरी, मुलांना सतत कोणत्या ना कोणत्या बंधनात अडकून ठेवणे. यामुळे त्यांना स्वतंत्र विचार करू दिला जात नाही. यामुळे अशी मुल कोणाचे तरी प्रेम मिळविण्यासाठी बाहेर पडतात. यातूनच त्यांच्या परदी निराशा येते. लेखकाच्या बहिणीला पसंतीचा नवरा न मिळाल्याने घरात सतत तिचा हुंडयासाठी चाललेला छळ. सासुचा जाच यामुळे त्या आत्महत्या करताना दिसतात.

ग्रामीण भागात अनेक खानदानी लोकांकडे शेतावर इंजिने असत. ते आपली शेती आधुनिक पध्दतीने करत होते. गावातील इतर शेतक-यांना हे खानदानी शेतकरी चौथाईन पाणी देत होते. यामुळे येणा-या पैशावर ते आरामशीर जगत होते.

मुळातच घरची श्रीमंती असल्यामुळे त्यांची मुले थोडीफार शित होती. अनेक ठिकाणी असलेल्या ओळखीमुळे ती चटकन नोकरी लागत होती. सामान्य तरूणांना मात्र अनेक कष्टाची कामे करून शिकून हातापायापडूनही नोकरी मिळत नाही. ही सार्वत्रिक परिस्थिती आहे.

पैशाअभावी ग्रामीण भागातील तरूणांना आपल्या कलागुणांना गुंडाळून ठेवावे लागते. लेखकाला आपल्या कवितेचा संग्रह पारितोषिकासाठी पाठविण्यास तो रजिस्टर

करण्यास पैसे नसतात. इतरांकडून पैसे मागून ते पाठवितात. आणि साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळतो. अशा कितीतरी तरूणांकडे कविता करण्याची प्रतिभा असेल परंतु पैशापुढे काहीही करता येत नाही. आपल्या समाजात एक म्हण आहे 'सर्व नाटके करता येतात पण पैशाचे नाटक करता येत नाही' ही सामान्य माणसाच्या दु:खातून आली आहे.

लेखकाला आकाशवाणी केंद्रावर नोकरी मिळाली तर आपल्याला प्रतिष्ठा प्राप्त होईल असे वाटते. यासाठी ते अनेक खटाटोप करून नोकरी मिळवतात. परंतु नोकरी लागल्यावर मात्र अनेक नामवंत साहित्यिकाकडूनही त्यांना योग्य वागणूक मिळत नाही. याचे मुळ कारण म्हणजे प्रत्येकजण आपल्या प्रतिष्ठेला चिकटून होता. आपण सर्वापेक्षा वेगळे आहोत याची जाणीव लोकांना करून देत होते. 'प्रतिष्ठा' हा शब्दच मुळी अहंकारातून आला आहे. श्रीमंताना प्रतिष्ठा असते त्यांनी काहीही केले तरी चालते त्यांना मोठेपणाच मिळत जातो. उलट गरिबांनी थोडी चूक केली तरी त्याचे त्याला खूप मोठे फळ भोगावे लागते.

ग्रामीण भागात अनेक छोटया मोठया कारणावरून भांडणे घरावरून, लहान मुलांच्या वरून आणि मुख्य म्हणजे जमिनीवरून भांडणे होतात. अशावेळी या लोकांना कोर्टकचे-यात जावे लागते. तेथील वातावरण त्यांना नवीन असते. त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन शेताचे मालक कोर्टात केस टाकून वकीलांना लाचलुचपत देऊन केस जिंकत होते. केसचा निकाल त्यांच्याविरूध्द लागला तर शेतमालक हायकोर्टात केस टाकत होते. यामुळे सामान्य कुळाने शेती करणा-या लोकांना अत्यंक हालअपेष्टा सोसाव्या लागत होत्या. यातून ग्रामीण भागातील लोकांच्या मनावर ताण येत होता. लेखकाच्या वडिलांना मळयाची काळजी करून अल्सर होतो. डॉक्टर त्याना ऑपरेशन करण्याचा सल्ला देतात. पण भिती पोटी ते म्हणतात" आपरीशन नगं खर्च झेपणार न्हाई. केलं तर मी कायमचा अधू होऊन बसीन. मला दृष्टांत पडलाय, दृष्टान्नात मला सांगितल 'दातवण खा' म्हणून दातवणांनं माझा रोग हळूहळू बरा होईल" [१८] असे खोटच स्वप्न पडल्याचे सांगून ही माणसे व्यसनाच्या आहारी जात होती. यामुळे रोगाचे प्रमाण अधिकच वाढत होते. खुळचट अंधश्रध्दा समाजात फोफावल्या होत्या त्याचा आधार हे लोक घेत होती व अधिकच आपल्या मनावर ताण वाढवत होती.

उच्चवर्णियाचें राहणीमान सामान्य लोकांना परवडणारे नव्हते. तसेच त्यांच्यात उच्चप्रति ठायी असणारी हौस सामान्य घरात टिकून राहत नाही. लेखक म्हणतात "ब्राम्हण माणूस हाही कष्टाळू असतो. साध्या नोकरीच्या मध्यवर्गातली स्त्री दिवसभर कष्टत असते. शारीरिक श्रम करत असते मात्र तिचे श्रम विचारपूर्वक, योजनापूर्वा चाललेले असतात. ती प्राप्त परिस्थितीतही समाधानी शांत राहून कष्ट मात्र सतत करते हळूहळू मुलांना शिकवून त्यांच्यावर योग्य संस्कार करून अपेक्षित दिशेने वाढवत राहते.

त्यामुळे ही मुले सहसा वाममार्गाला लागत नाहीत. शिक्षणात प्रयत्नपूर्वक यश मिळवितात नि जीवनात स्थिर होतात." [१९] परंतु सामान्य कुटुंबातील मुलाला शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो. कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय त्याला स्वतःच्या पायावर उभे रहावे लागते. यामुळे त्याचे निम्मे आयुष्य कष्टात जाते. दलित समाजातही शंकरराव खरात, लक्ष्मण माने, दया पवार, लक्ष्मण गायकवाड, बेबी कांबळे, किशोर काळे या तरूणांनी आपले आयुष्य आपण घडविले. कितीही संकटे आली तरी शिकण्याची उमेद न सोडता जिद्दीने शिक्षण घेतले व उच्च पदावर विराजमान झाले. ग्रामीण भागात असणारी संस्कृती, आचार विचार, हे शहरी भागापेक्षा पूर्णतः भिन्न स्वरूपाचे असतात. यामुळे मोठया साहित्यिक अथवा श्रीमंताच्या घरी गेल्यावर ग्रामीण तरूणाला अडखळल्यासारखे होतो. तो संकोचून जातो. तो त्याचा न्यूनगंड असतो.

म. फुले यांनी १८व्या शतकाच्या शेतीविषयक अनेक सुधारणा सांगूनही शेतीमध्ये त्यापध्दतीने सुधारणा होऊ शकली नाही. आजही शेती सुधारणाविषयक शेतकी अधिकारी दूरदर्शन अथवा रेडिओवर मोठमोठी भाषणे शेतीशास्त्राच्या परिभाषेत देतात. पण केवळ भाषणबाजीमुळं शेती सुधारणार नाही. तर त्यासाठी शेतावर जाऊन चिखलात पाय घालून आपल्या हातांनी कृती करून दाखविली पाहिजे. त्यांच्या भाषेत शेतक-यांशी बोलले पाहिजे असे केले तर शेती सुधारायला उशीर लागणार नाही. फकत ऑफिसात असून इस्त्रीचे कपडे खराब होणार नाहीत याची काळजी घेत बसल्यावर शेतकी खात्याचा विकास तेवढा होणार, शेती तिथेच राहणार. शेतक-यांना आधुनिक पध्दतीने शेती कशी केली पाहिजे याचे ज्ञान ग्रामीण भागात जाऊन लोकांना दिले पाहिजे. त्याच्या मनात शेतीविषयक अनेक उपक्रम भरवून दिले पाहिजेत. आज खेडोपाडी अनेक शेतकरी बागाईत करत असून त्यांना त्यात जास्तीत जास्त उत्पादन मिळत आहे. अनेक प्रकारची किडीवरील औषधे आज बाजारात उपलबध आहेत. यामुळे शेतीचा विकास चांगल्या प्रकारे होत आहे.

शेतात कष्ट करून लेखक कॉलेज करत होते. कॉलेज जीवनात त्यांना अनेक मित्र होते. काही श्रीमंत तर काही गरीब होते. त्यावेळी लेखकाच्या अनेक मित्रांचे प्रेम मुलीच्यावर बसले होते. त्यात काही सफल तर काही असफल झाले होते. त्या सर्वांची सुख दुःखे त्यांनी समजावून घेउन त्यांना योग्य सल्ला दिला. अजूनही समाजात प्रेमाला विरोध आहे. आपली भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे. या संस्कृतीत प्रेमविवाहाला विरोध होतो. खरे तर यातून चांगला जोडीदार मिळू शकतो. पण घरातील आई वडिलांचा दृष्टिकोन परंपरागत असतो. तरीही अनेक प्रेमविवाह होताना दिसून येतात. याला बदलती परिस्थिती कारणीभूत आहे.

अजूनही बहुजन समाजातील मुले आर्थिक परिस्थितीमुळे शिकू शकत नाहीत. मुळातच श्रीमंत घराच्या मुलांना शिक्षणात कोठेही खंड येत नाही. त्यामुळे ती भरपूर शिकतात. श्रीमंतीमुळे समाजात या लोकांना किंमत असते याचाच फायदा यांना नोकरी मिळते. नोकरीचा येणारा पगार मग अशी मंडळी सोने, गाडया, भारी कपडे, साडया यामध्ये खर्च करतात. याउलट अहोरात्र काम करून रात्री 'नाईट कॉलेज' करून अनेक हालअपेष्टा सहन करून वसंत पाटील सारखे गुणी, हुशार विद्यार्थी शिकत होते. गरिबीमुळे कुणाला शेतावर माणसे कमी पडतात म्हणून शाळा सोडावी लागली. तर पोटासाठी कोण हॉटेलमध्ये राहून कपबशा धूत बसला. लेखकाच्या अनेक मित्रांना गरिबीचे चटके बसले. अन् त्यांना शाळा सोडावी लागली. त्यात मधुकर सणगर पिढीजात घोंगडी घेऊन गावोगाव विकू लागला. रंगा भोसले लुगडी विणू लागला. आपल्या घरातील आर्थिक हालाखीमुळे ही मुलं शिकू शकली नाहीत.

ग्रामीण भागात आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गुणी हुशार मुलांचे शिक्षण खंडीत झाले. ज्याला पहिल्यापासून ऐषआरामात लोळण्याची सवय आहे. ज्याला कष्ट म्हणजे काय? पैसा याला किती महत्व आहे? याची किंमत ज्याला माहित नाही अशा मुला मुलीना विद्यापीठात का गोल्डमेडल मिळू नये? गरिबीतही आई वडिलांनी आपल्या मुलांना ऐपतीप्रमाणे शिकविले. हीच मुले पुढे अनेक मोठमोठया हुद्यावर गेली. पण आपली गरीबी मात्र विसरले नाहीत. शंकरराव खरात सारख्या माणसांने शिक्षण घेत असताना अनेक कष्ट सोसले पण जिद्दीने शिक्षण पूर्ण केले. मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू पर्यंत त्यांनी मजल मारली. पण आपली परिस्थिती विसरली नाहीत.

'नांगरणी' मध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैचारीक स्तर येतात. लेखकाने शिक्षण घेताना परिस्थितीशी दिलेली चिवट झुंज आईने दिलेली अप्रत्यक्ष साथ शिक्षण घेत असताना मदत करणारी अनेक माणसे त्यांना भेटत गेली. आज मात्र मदत करणारी माणसे कमी झाले आहेत. सामाजिक संघटन कमी झाले आहे. हा समाजाचा पराभव आहे. 'नांगरणी' म्हणजे लेखकाच्या मानसिक, बौध्दिक आणि सांस्कृतिक विकासाचा कलात्मक वेध होय.

## 'घरभिंती' मधील सामाजिक विचारांचा वेध

'झोंबी', नांगरणी' पेक्षा घरभिंतीमधील सामाजीक विचारांची पातळी भिन्न आहे. लेखक नोकरीला लागल्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात नोकरीला येतो. त्यामुळे शहरी-ग्रामीण भागातील समाजाचे दर्शन 'घरभिंती' मधून आलं आहे.

## श्रध्दा-अंधश्रध्दा

यादव जेव्हा पंढरपूरला प्राध्यापक म्हणून नोकरीला लागतात तेव्हा ते विठ्ठलाच्या मंदिरात जाताना फुलं, तुळशीची पाने, पेढे, नारळ, ऊद, कापूर घेऊन जातात. येथे त्यांची देवावर असणारी श्रध्दा दिसून येते. देवाच्या कृपेमुळे आणि शिक्षणासाठी अविरत धडपड केली याचे फळ त्यांना देवाने गोड दिले म्हणून ते मंदिरात जाऊन आपल्या प्राध्यापक व्यवसायाला सुरूवात करतात. ग्रामीण भागातून येणारे अशिक्षीत, आडाणी लोक यांच्या जीवावर जगणारे असंख्य दुकानदार मंदिराच्या शेजारी आपली दुकाने मांडून बसलेली दिसतात.

सुंदरा सासरी न नांदता घरी आल्यावर यादवांनी तिला खूप समजावले. ती जात नाही म्हणून रागाच्या भरात त्यांनी तिच्या थोबाडात दिली. तेव्हा तिच्या कानातून रक्त आले. कारण सासूने तिच्या कानात घातलेली फुंल काढून घेतली होती. फुलं नसल्यामुळे कानाची भोकं बुजून जाऊ नयेत म्हणून सुंदरानं दोन्ही कानाच्या भोकात बाभळीचं काटे थोडी थोडी टोकं मोडून घातले होते. अशा प्रकारची अंधश्रध्दा ग्रामीण स्त्रियामध्ये दिसून येत होती. कानाची छिद्रे बुजू नये अशी स्त्रियांची समजूत होती. कारण ते माहेरचं देण आहे. अशीही समजूत होती.

मळयाच्या मालकानं कोर्टात केस घातल्यामुळे यादवांचे वडील दररोज कोर्टात येत-जात असल्यामुळे "रात्री त्यांना स्वप्न पडत. त्या स्वप्नात निरनिराळया पोशाखांतली, जाति-धर्माची माणसं येत. काही तरी बोलून त्याला धीर देत. या स्वप्नांना दादा दृष्टांत म्हणे. स्वप्नात येणा-या माणसांना तो निरनिराळया वेशांत आलेले देव मानी. घोगडं घेतलेला एखादा धनगर स्वप्नात आला तर त्याला 'विरदेवाचा दृष्टांत' झाला म्हणे. दाढीवाला कुणी स्वप्नात आला तर दादा त्याला 'गैबी पीराचा दृष्टांत' झाला म्हणे. असा देवावर भरवसा ठेवून कोर्टातल्या तारखांना एकटाच उभा राही."[२०] गावातील पंचांना बोलावून शेतीच्या निकालाविषयी चर्चा होत असे. रत्नाप्पा म्हणतो,"साहेब, पंच म्हजे पाचमुखचा परमेसूर असतोय. तुम्ही म्हणता ते मला मान्य हाय." "असलं देवाच्या मनात तर देव मला मारणार न्हाई, तारणार हाय. त्यो कसा तारणार ते त्येच त्येला ठाव "[२२] गावातील पंच हे स्वार्थी, आपमतलबी असत एखाद्याकडून भरमसाठ पैसा उकळून ते गरीबाला लूटत असत आणि याच पंचाना परमेश्वर मानून त्यांचा शब्द अंतीम मानणारे ग्रामीण भागातील आडाणी, निरक्षर लोक होते. सुंदरान जीव दिल्यावर दादाला दृष्टांत पडतात. सुंदरान जीव दिलेला नाही अस त्याच्या स्वप्नात येई या अंधश्रध्देच्या पोटी लेखकाची आई पै-पाहुंण्याकड माणस लावून देत. सगळयाना प्रेमान आणि खडसूनही विचारत होती. रतनुची नरसोबाच्या वाडीच्या दत्तावर भक्ती होती. तसेच आप्पाच्या

वाडीच्या 'हलसिध्द आप्पावर' हा धनगर समाजाचा देव यांच्यावरही श्रध्दा होती." हलसिध्द आप्पा धनगराचा देव असल्यानं त्याची गादी घोंगडयाची आहे. त्यांच अंगावरचं पांघरूण घोंगडयाच आहं, तो घोडयावर बसलेला आहे ......... तेच रूपडं दादाच्या स्वप्नात येत". [२३]

धोंडूबाईचा नवरा एका देवरसिणीच्या नादाला लागतो या देवरसिणीला कोकणातून हाकलून दिले होते. तिने सिध्दनेर्ली गावात धोंडूच्या नव-याला "मागच्या जलमी तू माझ्या भगत हुतास." [२४] म्हणून मार्गी लावला. अनाचाराला धर्माचा आधार घेण्याची उच्चवर्णीयांची निती अशी आचरणात आणताना दिसतात. अनेक गावचे लोक त्या देवरसिणीकडे भेटायला येत होते. बाध्या घातला, मूठ मारली, सुई घुसवून लिंबू दारात टाकला, पोराला हगवण लागली, हातपाय वळत्यात असे अनेक आजारांची गा-हाणी तिच्यापुढे लोक मांडत होते. आजारी पडलेल्या स्त्रिया, पोरं लांब लांबच्या गावाहून गाडीत घालून आणली जात होती. माणस तिच्यापुढे सव्वा रूपाया, अडीच रूपये ठेवत. देवीच्या निवदाला ज्वारी, तांदूळ, गहू, डाळ इत्यादी शेतातलं किंवा कमावलेलं मूठपसा धान्य आणून ठेवत. कोणाला गुण यायचा कोणाला यायच नाही असे भरपूर पैसे कमवून ती देवरसिणी तेथून पळून जाते. ग्रामीण भागात असे अनेक भोंदू साधु, देवरसिण येत, अडाणी, दारिद्रयाने पछाडलेल्या लोकांना खोट-नाट सांगून त्यांच्याकडून रात्रंदिवस कष्टाने मिळवलेला पैसा लुटत होते.

यादवांचे वडील पुण्याला असताना दिवसभर त्यांना करमत नसे आपले मन हलकं करण्यासाठी ते ऐकडोबा मारूतीच्या देवळात जाऊन तासन्तास बसत असत. यादवांची बहिण लक्ष्मीच लग्न राधाकृष्णाचं देवळात होते. या देऊळावर घरातल्या सर्वांची श्रध्दा होती तसेच गोरगरिबांच्या लग्नाचा हे देऊळ मांडव होता. यादवांचा मित्र मधुकर सणगरला लग्नानंतर कित्येक वर्ष मूल होत नव्हते. डॉक्टरी उपचार, मांत्रिकाचा वापर व त्यानंतर खूप नवसं सायास करून त्याला मुलगा होतो. यादवांची आई त्यांना वंशाला दिवा म्हणून मुलगा पाहिजे म्हणून सांगते. त्यांच्या पत्नीचेही असेच म्हणणे असते. त्यासाठी ती उपवास करीत असते. येथे वंशाला मुलगा हवाच ही कल्पना स्त्री-पुरूष दोघांच्यातही प्रबळ झालेली दिसते. यादवांनी पुण्यात घर बांधल्यावर गृहप्रवेश करण्यापूर्वी 'वास्तूशांती'चा धार्मिक विधी पत्नीच्या आग्रहामुळे केला जातो.

हिराने आत्महत्या केल्यावर यादवांच्या "आईन हिराच्या पिंडावर ठेवायला अनेक पदार्थ केले. हिराच्या आवडीच्या कितीतरी वस्तु, अन्न. चहा, पापड, भजी, लाडू, तपकीर इ. ते सगळं हिराच्या राखेपाशी ठेवून आम्ही सगळे राखेला नमस्कार करून लांब जाऊन बसलो. अनेक कावळयांनी त्यावर झडप घातली. काही कावळे त्यांतल्या वस्तू घेऊन देवतासारखे आकाशमार्गाने निघून गेले." [२५]

अशा प्रकारे अनेक श्रध्दा-अंधश्रध्दा 'घरभिंती' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून आलेल्या आहेत.

### वंशाला कुलदीपक हवा :

वंश सातत्य टिकावे ही सर्वच माणसांची सहजप्रवृत्ती आहे. वंश वाढविण्यासाठी मुलगाच हवा तो कुळाचा दिवा ठरतो, म्हणून त्यासाठी देवाला नवस सायास केले जाताना दिसते. यादव-स्मितालाही वशांला कुलदीप हवा म्हणून स्मिता नवस, उपवास करते. मांत्रिकाला बोलविते. हिराला मूलबाळ नाही. तिचं आरोग्य चांगल नाही म्हणून शंकरचा वंश वाढावा म्हणून तिच सोडपत्र म्हणून शंकरच दुसर लग्न करताना दिसतो. समाजात अशा अनेक स्त्रियांना मुलीच होत, अशा वेळी मुलगा पाहिजे या हव्यासापोटी लोकसंख्या भरमसाठ वाढत होती. ते अंधश्रध्देच्या आहारी जात होते.

### घरभिंतीतील लग्न व्यवस्था

घरभिंतीतून आपल्याला लग्नव्यवस्था प्रत्ययास येते. पै-पाहुण्यांच्यात लग्न करण्याची जास्तीत जास्त पध्दत दिसून येते. यादवांची थोरली बहीण आनसाबाई वारल्यावर त्याच्या मामाने एकदोन वर्षात रखमाईशी लग्न केलेले दिसून येते.

मामांची मुलगी यादवांनी करावी म्हणून तो यादवांच्या आईला खूप समजावून सांगतो. यादव वयाचे निमित्त लावतात तेव्हा मामा म्हणतो, "अरे, इंग्रज सरकारच्या काळात म्हाळुंगीचा एक पाटील हुता. त्येनं चार बायका केल्या हुत्या. लग्नाच्यायळला त्येची चौथी बायकू बारा वर्साची हुती नि त्यो पन्नास वर्साचा हुता. चाळीस वर्साचे अंतर. त्याच पैल लगीन झाल तवाच त्येला पोरं झाली असती तर त्येची नातवंड चौथ्या लग्नात बारा-चौदा वर्साची झाली असती आणि तू आक्काताईबद्दल मातूर निमित्त सांगतोस व्हय?" [२६] वयाचे अंतर दोघांच्यातही खूप असल्याने तसेच यादव मामाच्या मुलीला बहिणीप्रमाणे मानत होते म्हणून ते तयार नसतात. मामा म्हणतो,"हे बघ आन्दा, तुला एक शेवटच सांगतो. दादाला सांगून आक्काताईला आम्ही तुझ्यासाठी ठेवली. तुझ्यासाठी शिकविली. वाटीतल ताटातच सांडाव अशी आमची भावना. दादा रोजगारी माणूस. त्येला झाली तर आपण मदत केली पाहिजे. तिच्या लग्नाची काय काळजी करू नगं, म्हणून मीच त्येला सांगितलय. वाईच तुला अवघड वाटत असंल तर त्येच्यातनंबी वाट निघल. तू आक्काताईसंग लगीन कर. दोन तीन वरसं काय हुतय ते बघू. आणि न्हाईच तुला तिच्याबद्दल बायकूपणाची भावना वाटली तर मग दुसरं लगीन कर. एकाला दोन बायका

असल्या तर तोटा न्हाई. एक हित कागलात आक्काच्या हाताखाली -हाईन नि दुसरी तुझ्यासंग नोकरीच्या जागी यील. लई तर एक नोकरी करंल नि दुसरी घरदार सांभाळल ..... हयेचा इचार कर नि मला उद्या काय ते सांग." [२७] लहानपणापासून यादव आक्काताईला बहिण मानत आले आणि तिच्याशी लग्न करून, संसार करून भैणीच नातं बाद करायच कशासाठी? तर घरातील सर्वांना समाधान वाटावे. शेवटी वसंत पाटील मित्राच्या मामाच्या मुलीशी ते सर्वांचा विरोध असताना लग्न करतात.

समाजात अनेक आंतरजातीय विवाह केले जात होते. "एका उच्चवर्णीय साहित्यिकांन त्यापेक्षा खालच्या जातीतील मुलीशी प्रेमविवाह केलेला तर दुस-या एका मध्यम जातीतील साहित्यिकान उच्चवर्णीय मुलीशी प्रेमविवाह केलेला." [२८] असे विवाह सुशिक्षीताना जमू शकतात पण ग्रामीण भागातील सनातन सरंमजाई वातावरणात वाढलेल्या मुलांना, तरूणांना मात्र यापासून आपल्या परिस्थितीमुळे अविरत रहाव लागंत होतं.

धोंडू सुंदरा यांचीही लग्ने लहान वयातच झाली होती. यापाठीमागे घरची आर्थिक परिस्थितीच जबाबदार होती.

## नविन कुळकायदे

'कसेल त्याची जमीन' अशा सरकारच्या नवीन कायद्यामुळे फाळयानं जमिनी करणा-या शेतक-यांच्या जमिनी मालकांनी पटापट काढून घेतल्या. लेखक म्हणतात "मळयाच्या मालकानं आमच्या विरूध्द कोर्टात निरनिराळया कलमाखाली अनेक दावे लावले होते. सरकारनं शेतीसंबंधी, शेतक-यासाठी, कुळासाठी जे नवे कायदे आणले होते, त्यांचा हा परिणाम होता. आम्ही मालकाला खंड किती द्यायचा हे कायद्यानं ठरवून दिल होत. त्या केसच्या निकालानुसार दादा वेळच्या वेळी फाळा म्हणजे खंडाची रक्कम मालकाला देत होता. मालक ती देऊन पावती देत होता. पण सरकारनं ठरवून दिलेला हा फाळा मूळ कबुलायतीत ठरलेल्या फाळयापेक्षा कितीतरी कमी म्हणजे चारशे सव्वीस रूपये होता. कबुलायतीत ठरलेला फाळा एक हजार साठ रूपये होता. शिवाय गुळाची ढेप, रसाची घागर, उसाची मोळी, गाडीच्या दोन वेठी मळयात पिकेल ते थोडे थोडे नमुन्यासाठी देणं, झाडाचे आंबे देणं अस बरच काहीबाही होत." [२९] नविन कुळकायद्याचा फटका लेखकाच्या घरालाही बसला होता.

लेखकाच्या वडीलांनी सुरक्षित कुळ म्हणून मान्यता मिळावी, म्हणूनही त्यांनी कोर्टात दावा घातला पण उलट त्याच्या मालकानंच एका मागोमाग एक असे चार-पाच दावे टाकले. सरकारी कायद्याचा फटका प्रामुख्याने मालकांना बसला. नवीन मिळणा-या कमी फाळयामुळे मालकाचे नुकसान होऊ लागले. त्यामुळे ते वरच्या कोर्टात जाऊ

लागले. तरीही कायद्यात बदल झाला नाही. लेखकाच्या वडीलांना आत्मविश्वास होता की "मालकानं आपल्या विरूध्द कोर्टात कितीही दावं लावलं तरी शेवटाला आपला मळा काय जाणार न्हाई." [३०]

शेतीचे मालक हुशार होते त्यांना उत्तम इंग्रजी बोलता येत होते. यामुळे त्यांचे अनेक वकिलांशी मैत्रीचे संबंध होते. कुळाविषयी सरकारी कायदे आल्यापासून ते शेती सोडवून घेण्याच्या उद्योगाला लागले होते. या मालकांनी अशा शेतक-यांच्या बरोबर गोड बोलून, थोडे पैसे देऊन शेते काढून घेतली. मालकांना कोर्टात जावे लागले. वकिलांच्या खोटया अश्वासनावर हे लोक भुलत होते निर्धास्त रहात होते याचा फायदा मालक घेत होते. या कोर्टकचे-यांच्या काळजीमुळे लेखकांच्या वडीलांना अल्सर होतो. शेवटी निकाला नंतर मालक कोर्टात नातेसंबंध, ओळखी असल्याने अनेक खटपटी करून लेखकाच्या वडीलांशी गोड बोलून त्यांचा विश्वासघात करतो. ही पिळवणूक बहुजन समाजाची ती कुळकायद्याने संपवता आली नाही.

नवीन कुळकायदे आले तरी त्यातून अनेक मार्ग मालकांनी काढून आपल्या जमिनी काढून घेतल्या. यामुळे ग्रामीण भागातील फाळयाने जमिनी करणा-या शेतक-यांच्या वाटयाला दु:खच आले.

## सण-उत्सव

घर भिंतीतून भाऊबीज दिवाळी अशा अनेक सणांचे दर्शन घडते. लेखक म्हणतात, "भाऊबीजेचा दिवस धोंडू-सुंदरा माहेराला आलेल्या. हिरा घरातच होती. लक्ष्मी, अनसा अजून तशा लहान." [३१] भाऊबीजेच्या दिवशी सर्वांना आनंद झाला होता. या उत्साहाच्या भरातच सर्व बहिणीच्या वतीने हिराबाई म्हणाली,"दादा अंगावरची कपडं काढा. सगळयाजणी तेल, उटणी लावतावं, मग आंघूळ घालतांव" [३२] ग्रामीण भागात उत्साहाने भाऊबीज साजरी केली जाते. दूर गावी दिलेल्या मुली आपल्या माहेरी येत होत्या. तर आपल्या बहिणीकडे भाऊ जाऊन भाऊबीज करून येत होते.

दिवाळीच्या दिवशी सर्वजण पहाटे लवकर उठून आंघोळ करून नवनविन कपडे घालत होते. तसेच सकाळी शेजारी पाजा-यांना आदराने फराळाला बोलावले जात होते. यामुळे चांगले संबंध जोपासले जात होते.

ग्रामीण भागात दरवर्षी यात्रा भरत, या यात्रा, उरूसामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन एकोप्याने हा उत्सव साजरा करत होते.

अशा प्रकारे सामाजिक जीवनाचे चित्रण घरभिंतीतून पहावयास मिळते.

# संदर्भ ग्रंथ


| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | झोंबी (प्रस्तावना) | आनंद यादव | १८ |
| २ | व्हॅलंटरी शिक्षक आठवणी | शंकर य. भागवत | १८,१९ |
| ३ | झोंबी | आनंद यादव | २१२ |
| ४ | झोंबी | आनंद यादव | २१२ |
| ५ | झोंबी | आनंद यादव | २१३ |
| ६ | व्हॉलंटरी शिक्षक आठवणी | शंकर य. भागवत | ९१ |
| ७ | सारे प्रवासी घडीचे | जयवंत दळवी | १४० |
| ८ | दैनिक पुढारी | ९ नोव्हेंबर ९८ | |
| ९ | झोंबी | आनंद यादव | ३४५ |
| १० | आनंद यादव व्यक्ति आणि वाङ:मय | डॉ. रविंद्र ठाकूर | ४४ |
| ११ | नांगरणी | आनंद यादव | ७२ |
| १२ | महात्मा फुले समग्र वाङ:मय | संपादक य. दि. फडके | २९९,३०१ |
| १३ | नांगरणी | आनंद यादव | ७३ |
| १४ | नांगरणी | आनंद यादव | २६८ |
| १५ | नांगरणी | आनंद यादव | १४७,१४८ |
| १६ | नांगरणी | आनंद यादव | २०७ |
| १७ | नांगरणी | आनंद यादव | १७० |
| १८ | नांगरणी | आनंद यादव | २५८ |
| १९ | नांगरणी | आनंद यादव | २९३ |
| २० | घरभिंती | आनंद यादव | ८१ |
| २१ | घरभिंती | आनंद यादव | ८६ |
| २२ | घरभिंती | आनंद यादव | ८७ |
| २३ | घरभिंती | आनंद यादव | ११७ |
| २४ | घरभिंती | आनंद यादव | १३४ |
| २५ | घरभिंती | आनंद यादव | ४२० |
| २६ | घरभिंती | आनंद यादव | १७ |
| २७ | घरभिंती | आनंद यादव | १७ |
| २८ | घरभिंती | आनंद यादव | २४ |

# संदर्भ ग्रंथ

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २९ | घरभिंती | आनंद यादव | ७८ |
| ३० | घरभिंती | आनंद यादव | ८० |
| ३१ | घरभिंती | आनंद यादव | ४५ |
| ३२ | घरभिंती | आनंद यादव | ४५ |
| ३३ | बलुतं | दया पवार | |
| ३४ | उपरा | लक्ष्मण माने | |
| ३५ | तराळ-अंतराळ | शंकरराव खरात | |
| ३६ | काटयावरची पोरं | उत्तम तुपे | |
| ३७ | गबाळ | दादासाहेब मोरे | |
| ३८ | तांडा | आत्माराम राठोड | |
| ३९ | चौडक | राजन गवस | |